|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जळगाव दि. 31 : कला, वाणिज्य व विज्ञान प्रथम वर्ष आणि एम.ए., एम.कॉम. प्रथम वर्ष अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे पात्रतेचे अर्ज विलंब शुल्कासह महाविद्यालयांनी विद्यापीठात सादर करण्याची मुदत 31 ऑगस्ट ऐवजी 6 सप्टेंबर, 2010 पर्यंत वाढविण्याचा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

परीक्षा नियंत्रक डॉ. एम.एम. पवार यांनी कळविले आहे की, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संबंधित पदवी स्तरावरील कला, वाणिज्य व विज्ञान प्रथम वर्ष आणि एम.ए., एम.कॉम. प्रथम वर्ष अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे पात्रतेचे अर्ज विद्यापीठात महाविद्यालयाने सादर करावयाची तारीख 31 ऑगस्ट अशी देण्यात आली होती. मात्र, विद्यार्थी हित लक्षात घेता हे पात्रतेचे अर्ज विलंब शुल्कासह 6 सप्टेंबर, 2010 पर्यंत महाविद्यालयाने विद्यापीठात सादर करावयाचे आहेत.

आपला विश्वासू,
Sd/-
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी